कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२५–२६/११४०
दि. ०७/०८/ २०२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती राज्यस्तरीय भजन स्पर्धा या कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर कलामंदिरात आयोजित करण्यात आल्या असून बाल कलाकारांची राज्यस्तरीय स्पर्धा मंगळवार दि १२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता, महिला कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा बुधवार दि १३ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता तर पुरुष कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा शुक्रवार दि १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजल्यापसून निश्चित करण्यात आली आहे.

दि १५ ऑगस्ट २०२५ रोजी पुरुष कलाकार भजन स्पर्धेला जोडून सायं. ६.३० वा. विभागीय व राज्यस्तरीय बाल, महिला व पुरुष कलाकार भजन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार असून गोवा राज्याचे सन्मा. मुख्यमंत्री व कला अकादमीचे अध्यक्ष डॉ. प्रमोद सावंत हे या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत.

स्पर्धांचा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून भजनप्रेमी रसिकांनी सदर स्पर्धांना तसेच पारितोषिक वितरण समारंभालाही मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कला अकादमीतर्फे करण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसएस